अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

१९ वर्षांखालील आशिया चषक

## सोलापूरच्या अर्शिन कुलकर्णीची अष्टपैलू कामगिरी

**दुबई** : भारतीय संघाने आजपासून सुरू झालेल्या १९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेत विजयी सलामी दिली. अफगाणिस्तान विरुद्धच्या सामन्यात भारताने सात विकेट्स व ७५ चेंडू राखून बाजी मारली. भारताच्या या विजयात सोलापूरचा अर्शीन कुलकर्णी याने सिंहाचा वाटा उचलला. त्याने नाबाद ७० धावा केल्या, शिवाय ३ विकेट्स घेतल्या. १८ वर्षीय अर्शीनला टीम इंडियाचा भविष्याचा स्टार ऑल राऊंडर म्हणून संबोधले जात आहे.

भारतीय गोलंदाजांनी टिच्चून मारा करताना अफगाणिस्तानच्या धावांचा ओघ आटवला आणि त्या दडपणात फलंदाजांनी विकेट फेकल्या. सलामीवीर



जमशीद झाद्रान ( ४३) , अक्रम मोहम्मदझाई ( २०), नुमन शाह (२५) आणि मोहम्मद युनुस ( २६) यांनी अफगाणिस्तानकडून चांगल्या धावा केल्या.

अर्शीनने ८ षटकांत २९ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. राज लिंबानीने ४६ धावांत ३, तर नमन तिवारीने ३० धावांत २ बळी टिपले. मुरुगन अभिषेक व मुशीर खान यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

www.surajyadigital.com | शनिवार, दि. ०९ डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ७० वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# गुन्हे सरसकट मागे घेणार नाही

## आंतरवली सराटीमधील लाठीमारावर गृहमंत्री फडणवीसांकडून लेखी उत्तर

सुराज्य/नागपूर

**ज्या जालना जिल्ह्यातील आंतरवली सराटीमध्ये मनोज जरांगे पाटील करत असलेल्या उपोषणस्थळी जालना पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीमारानंतर आंदोलनाचा भडका राज्यभर उडाला. त्या घटनेवरून आज पहिल्यांदाच उपमुख्यमंत्री तथा राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेमध्ये लेखी उत्तरामध्ये त्या दिवशी घडलेल्या घटनेचा तपशील सादर केला. त्याचबरोबर निलंबित करण्यात आलेल्या पोलिस अधिकाऱ्यांची आणि केलेल्या कारवाईची माहिती दिली.**

सर्व बाबींची माहिती घेतल्यानंतर गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया केली जाईल, असे त्यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे आंतरवाली सराटीमध्ये दाखल झालेले गुन्हे हे सरसकट मागे घेतले जाणार नाहीत हे विधानसभेतील फडणवीस यांनी दिलेल्या लेखी उत्तरावरून स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे, राज्यामध्ये मराठाविरुद्ध ओबीसी असा राजकीय संघर्ष पेटला आहे. यामध्ये ओबीसी समाजाकडून छगन भुजबळ हे सातत्याने मनोज जरांगेंविरोधात वक्तव्य करत आहेत, दुसरीकडे जरांगे पाटील यांच्याकडूनही वक्तव्य केली जात आहेत.

आंतरवाली सराटीमध्ये छगन भुजबळ यांनी प्रत्युत्तर सभा घेत पोलिसांवर झालेल्या हल्ल्याचा सातत्याने मुद्दा उपस्थित केला होता. मात्र, देवेंद्र गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आंतरवाली सराटीमध्ये झालेल्या मारहाणीनंतर छगन भुजबळ यांच्याकडून होत असलेल्या आरोपांवर आतापर्यंत मौन बाळगले होते.

मात्र, त्यांनी आज हिवाळी अधिवेशनामध्ये सर्व प्रश्नांची लेखी उत्तरे देत एक प्रकारे पोलिसांची पाठराखण केली आहे. मनोज जरांगे-पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी २४ डिसेंबरची डेडलाईन देतानाच आंतरवाली सराटीत दाखल झालेले गुन्हे सरसकट मागे घ्यावी अशी मागणी सातत्याने केली आहे. ओबीसींमधूनच आरक्षण घेणार असा त्यांनी निर्धार केला आहे.



### अजित पवार गट फडणवीसांच्या भेटीला

त्यानंतर अजित पवार गटाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी बोलताना नवाब मलिक यांनी आपली कोणतीही भूमिका जाहीर केलेली नाही. त्यामुळे आम्ही नवाब मलिकांच्या बाबतीत भूमिका घेणे अयोग्य असल्याचे फडणवीस यांच्या कानावर घातलं. त्याचबरोबर आमदार म्हणून त्यांना सभागृहात बसण्याचा अधिकार असल्याचे सुद्धा पटेल यांनी देवेंद्र फडणवीस यांना सांगितले. मलिकांनी भूमिका जाहीर न केल्यामुळे त्यांना जी खुर्ची देण्यात आली होती ती त्यांनी स्वीकारली नसल्याचे पटेल यांनी सांगितले.

### प्रफुल्ल पटेलांवर भाजपचे मौन

दरम्यान, नवाब मलिकांविरोधात भाजप आणि शिंदे गटाने आक्रमक भूमिका घेतली असली, तरी प्रफुल्ल पटेलांवर भाजपनं मौन बाळगणं पसंत केलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी पत्र पाठवल्यानंतर कोणतीच प्रतिक्रिया दिली. भाजप नेते आशिष शेलार यांनीही प्रफुल्ल पटेलांवरील आरोपावर उत्तर दिलं नाही. भाजप प्रदेशाध्य चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रकरण वेगळं असल्याचे सांगत पटेलांवर थेट प्रतिक्रिया दिली नाही.

### मलिक प्रकरणात फडणवीसांच्या पाठीशी भाजप ठाम

जनतेला अपेक्षित भूमिका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली. आमदार नवाब मलिक यांच्यासंदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेली भूमिका धाडसी आहे. मलिक यांच्यावर देशद्रोह्यांना समर्थन केल्याचा आरोप आहे त्या विरोधातील ती भूमिका आहे. त्याचा वैयक्तिक राजकारणाशी काहीही संबंध नाही. भाजपाचे संपूर्ण कॅडर फडणवीस यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे', असे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना केले.

### गुन्हे मागे घेण्यास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा नकार

देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांनी बचावात्मक आणि वाजवी पद्धतीने बळाचा वापर केल्याचे म्हटले आहे. या घटनेमध्ये जवळपास ५० आंदोलक जखमी झाले असून, ७९ पोलीस जखमी झाल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे पोलिस सर्वाधिक जखमी झाल्याचे फडणवीस यांच्या निवेदनावरून स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे, मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे-पाटील यांनी आंतरवाली सराटीमध्ये झालेल्या लाठीमारानंतर गुन्हे दाखल झाल्याच्या पार्श्वभूमीवर सर्व गुन्हे सरसकट मागे घ्यावेत, यासाठी सातत्याने सरकारकडे मागणी केली आहे. मात्र, या संदर्भात फडणवीस यांनी कोणत्याही पद्धतीने गुन्हे सरसकट मागे घेण्यास नकार दिला आहे.

तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का

# महुआ मोईत्रा यांची खासदारकी रद्द

**नवी दिल्ली** : तृणमुल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे. 'कॅश फॉर क्वरी' प्रकरणात त्यांच्यावर विधानसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी ही कारवाई केली. शुक्रवारी लोकसभेत याप्रकरणावर एथिक्स कमिटीचा अहवाल सादर केला.

या प्रकरणावर बोलताना लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांचा प्रस्ताव सभागृहात मतदानासाठी ठेवला. खासदार निशिकांत दुबे यांनी खासदार महुआ मोईत्रा यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती की, त्यांनी सभागृहात प्रश्न विचारण्याच्या बदल्यात पैसे घेतले होते. हे प्रकरण तपासण्यासाठी १५ ऑक्टोबर २०२३ रोजी एथिक्स कमिटीकडं देण्यात आले होत.

या कमिटीचा अहवाल प्राप्त झाला आहे. हा अहवाल स्विकारण्यात आला आहे. त्यानुसार, महुआ मोईत्रा यांचे वागणे हे अनैतिक आणि खासदार म्हणून अशोभनीय आहे. त्यामुळे त्यांनी लोकसभा सदस्यत्वपदी राहणे योग्य राहणार नाही. यासाठी त्यांचे लोकसभा सदस्यत्व निलंबित करण्यात यावे, यासाठी यानंतर यावर मतदान घेतले गेले. यानंतर हा प्रस्ताव लोकसभेत मंजूर करण्यात आला आणि महुआ मोईत्रा यांच्या निलंबनावर शिक्कामोर्तब करण्यात आले.



### आमचा पक्ष महुआ यांच्यासोबत : ममता

मी आपल्याला सांगत आहे की, महुआ मोइत्रा या परिस्थितीच्या बळी ठरल्या आहेत. मी याचा तीव्र निषेध करते. आमचा पक्ष महुआ यांच्यासोबत आहे. आमचा पक्ष इंडिया सोबत एकत्रितपणे लढणार आहे. हे लोकशाहीचे दुर्दैव आहे. आज, भाजपची भूमिका पाहून मला वाईट वाटते. त्यांनी लोकशाहीला कशा पद्धतीने धोका दिला आहे. त्यांनी महुआ यांना त्यांची बाजू मांडण्याची परवानगीही दिली नाही. पूर्णपणे अन्याय करण्यात आला आहे.

# बाजार समितीत कांदा लिलाव न झाल्याने शेतकऱ्यांचे आंदोलन

लिलावाच्या आश्वासनानंतर शेतकऱ्यांचे आंदोलन मागे

सुराज्य/सोलापूर

एकीकडे केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर निर्बंध आणल्यामुळे त्याविरोधात शेतकरी आणि व्यापारीवर्गात असंतोष कायम असताना राज्यातील कांद्याची प्रमुख बाजारपेठ असलेल्या सोलापूर कृशी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा दाखल झाला. परंतु, कांदा लिलाव बंद राहिल्यामुळे शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त करीत कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासन व व्यापाऱ्यांच्या विरोधात सोलापूर-पुणे, हैदराबाद महामार्ग रोखण्याचा प्रयत्न केला. नंतर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासकीय इमारतीसमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

गेल्या दि. ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिनी कांदा लिलाव बंद ठेवला होता. मुळातच कांदा दरात घसरण सुरू असताना काल गुरूवारी ८६ हजार ८०१ क्विंटल इतक्या मोठ्या प्रमाणात कांदा दाखल झाला होता. यात कमाल पाच हजार रूपये आणि सर्वसाधारण दर २६०० रूपये मिळाला होता. दरात सुमारे तीनशे रूपयांची घसरण झाली. शुक्रवारी तेवढ्याच प्रमाणात कांद्याची आवक झाली. परंतु व्यापाऱ्यांनी कांदा खरेदी करण्यास नकार दिला. कांदा लिलाव अचानकपणे बंद ठेवल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली. सोलापूर जिल्ह्यातील सर्वदूर भागासह पुणे, नगर, सांगली, मराठवाडा, कर्नाटकातील शेतकऱ्यांनी मोठा वाहतूक खर्च करून कांदा आणला होता. परंतु, कांदा लिलाव होणार नसल्याची कोणतीही पूर्वसूचना नसल्यामुळे शेतकऱ्यांची अडचण झाली. त्यातूनच संतापलेले शेतकरी रस्त्यावर आले होते.



### 'या' आश्वासनानंतर आंदोलन मागे

बाजार समितीचे संचालक केदार उंबरजे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना त्यांच्या कांद्याचे काटे तात्काळ सुरू करत शनिवारी या कांद्याचे लिलाव होतील, असे जाहीर केले. त्याचबरोबर शनिवारी कुठल्याही प्रकारची नवीन आवक बाजारात होणार नाही, अशीही घोषणा त्यांनी केली. या घोषणेमुळे शेतकरी आंदोलन मागे घेण्यात तयार झाले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



इतक मोठ घबाड!
माणसाला जगायला
किती लागतं ?

| कल्याण |
| --- |
| ---- |

| मुंबई |
| --- |
| --- |

## साडेतीन लाखांचे दागिने पळवले

**सोलापूर** : दरवाजा पुढे केलेला असताना तो उघडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करीत हॉलमधील कपाट उघडून कपाटातील सोन्याच्या पाटल्या व अडीच तोळे सोन्याचे लॉकेट असे जवळपास तीन लाख ४० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. फिर्यादींची सुनेने घराचा दरवाजा पुढे केला असताना अज्ञात चोरट्याने ही चोरी केली.

सासरे श्रीशैल काशिनाथ कलशेट्टी (भवानी पेठ) यांनी अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. तपास सहायक पोलीस निरीक्षक पवार हे करत आहेत.




